# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 27/02/2024 (मंगळवार) सायंकाळ

---

### पो.स्टे. सावनेर हद्दीत जुगार अड्डयावर धाड

### —: नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक २६/०२/२०२४ रोजी पोलीस स्टेशन सावनेर येथील स्टाफ अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन सावनेर येथील पहलेपार येथे काही इसम अवैध जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पोलीस स्टेशन सावनेर येथील स्टाफला प्राप्त झाले वरून सदर स्टाफ यांनी पहलेपार येथे जावुन पाहणी केली असता त्या ठिकाणी लोकांची गर्दी दिसली. तेथे पोलीसांना पाहुन काही लोक पळु लागले. त्यांना स्टाफच्या मदतीने पकडण्यात आले. सदर ठिकाणी सापळा रचुन छापा टाकुन **१) सुंदरलाल हुकुंमचंद कोंढोले वय ५० वर्ष रा. वार्ड नं. १७, सावनेर, २) जगदिश भैयालाल बसोटीया वय ५२ वर्ष रा. वार्ड नं. १७, सावनेर, ३) किशोर धुलीचंद ठाकुर वय ३४ वर्ष रा. वार्ड नं. १७, सावनेर, ४) जयंत लक्ष्मीणारायण आमगावकर वय ३२ वर्ष रा. वार्ड नं. १७, सावनेर, ५) अक्षय उर्फ विरेन्द्र नामदेव बहेटवार वय २९ वर्ष रा. वार्ड नं. १७, सावनेर, ६) संदिप गंगाराम तुरे वय ४१ व ा रा. वार्ड नं. १७, सावनेर, फरार आरोपी क्र. ७) जिवन भैयालाल बासोटीया रा. वार्ड नं. १७, सावनेर, ( फरार ) ८) सुरेश वर्मा रा. वार्ड नं. १७, सावनेर, ( फरार )** हे पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०८ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन आरोपी क्र. ०१) याचे अंगझडती मध्ये नगदी ४१८०/— रू. व रेड मी कंपनीचा एन्ड्रॉइड मोबाईल किमंती ३५००/— रू. ०२) याचे अंगझडती मध्ये — नगदी २३३०/— रू. ०३) याचे अंगझडती मध्ये — नगदी २०३०/— रू. व ओपो कंपनीचा मोबाईल किमंती ४०००/— रू. ०४) याचे अंगझडती मध्ये — नगदी ३२००/— रू. व ओपो कंपनीचा मोबाईल किमंती ३०००/— रू ०५) याचे अंगझडती मध्ये — नगदी १८००/— रू. व रेड मी कंपनीचा मोबाईल किमंती २०००/— रू ०६) याचे अंगझडती मध्ये — नगदी १२००/— रू. व सॅमसंग कंपनीचा मोबाईल किमंती ४०००/— रू. असे अंगझडतीत मिळालेले एकुण १४,७४०/— रू. व ५ मोबाईल एकुण किमंती १६,५००/— रू.तसेच घटनास्थळावर मिळालेले ५२ तास पत्ते कि. ००/— रू. असे अंगझडतीत व ०५ मोबाईल असा एकुण ३३,०६०/— रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे सावनेर येथे कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा केला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर